# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-24.07.2026** **वार- शुक्रवार**

---

**आषाढी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सोलापूर मध्ये राज्यस्तरीय कृषि पंढरी प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. यावेळी माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या संवादवारी ज्ञानेश्वरी या दालनाचं उद्घाटन देखील झालं.
उद्याच्या आषाढीच्या पार्श्वभूमीवर न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग मध्ये नाट्य छंद वर्गाच्या 300 विद्यार्थ्यांनी महापौर मंजूषा नागपुरे यांच्या उपस्थितीत आषाढ वारीच्या पालखी सोहळ्याचं सादरीकरण केलं. विद्यार्थ्यांनी संतांचे विचार आचरणात आणून समाजात सद्भावना, समता आणि सेवाभाव जोपासावा असं आवाहन महापौर नागपुरे यांनी यावेळी केलं.

दरम्यान, संत तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या पालख्या आज पंढरपूर मध्ये दाखल होतील. आषाढी एकादशी निमित्त उद्या पंढरपूर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महापूजा होणार आहे. राज्यात विविध ठिकाणी आषाढी निमित्त वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांच आयोजन करण्यात आलं आहे.

**धरणसाठा**

राज्यातील पावसामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होत असून, जलसंपदा विभागाच्या आजच्या अहवालानुसार राज्यातील 3 हजार 29 धरणांमध्ये 53 पूर्णांक 38 शतांश टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 63 पूर्णांक 42 शतांश टक्के होता.

विभागनिहाय पाहता, कोकण विभाग सर्वाधिक 76 पूर्णांक 54 शतांश टक्के पाणीसाठ्यासह राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ पुणे विभाग 65 पूर्णांक 27, नाशिक 55 पूर्णांक 11, नागपूर 46 पूर्णांक 71, अमरावती 42 पूर्णांक 91 शतांश तर छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वात कमी म्हणजे 25 पूर्णांक 44 शतांश पाणीसाठा आहे.

**पवना धरण**

पवना धरणातून आज दुपारी 3 वाजता सांडव्याद्वारे पवना नदीपात्रामध्ये 3 हजार 420 क्युसेक क्षमतेने विसर्ग करण्यात येणार असून एकूण विसर्ग 4 हजार 820 क्युसेक होणार आहे.नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये तसंच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

**महाराष्ट्र साहित्य परिषद**

पाली, मराठी, संस्कृत या भारतीय भाषा संस्कृतीला जोपासणाऱ्या, परंपरा समृद्ध करणाऱ्या भाषा आहेत. भाषेतून ज्ञान प्राप्त होते आणि ते संवादाचे उत्तम माध्यम म्हणून कार्य करत असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान आणि महात्मा फुले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ पहिल्या लोकशिक्षक बाबा भारती साहित्यरत्न पुरस्काराने प्रा. डॉ. महेश देवकर यांचा गौरव करण्यात आला. त्या वेळी डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते.

लोकभाषा आणि प्रमाण भाषा यांची संवादी बेरीज करण्याची भूमिका डॉ. महेश देवकर यांची असल्यामुळे पाली भाषेचे महात्म्य लोकांपर्यंत पोहोचत आहे, याविषयी त्यांनी आनंद व्यक्त केला.
महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात गुरुवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पाली भाषेच्या अभ्यासासाठी मला कुटुंबियांकडून प्रेरणा मिळाल्याचं डॉ. महेश देवकर यांनी पुरस्काराविषयी भावना व्यक्त करताना सांगितलं. या विषयी मराठी भाषेमध्ये उपलब्ध असणारा एकमेव परिपूर्ण कोश लोकशिक्षक बाबा भारती यांनी तयार केला आहे. लोकशिक्षक बाबा भारती यांच्या नावे मिळालेला सन्मान हा पाली भाषेचा, परंपरेचा आणि परंपरा निर्माण करणाऱ्या महान व्यक्तींचा आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून पाली भाषेला पुन्हा पुनरुज्जिवीत करून तिला बळ देण्याचा प्रयत्न असल्याचं देवकर यावेळी म्हणाले.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण आणि वेगवान विकासासाठी महापौर रवि लांडगे यांनी दिल्ली दौऱ्यात केंद्र सरकारसमोर शहराशी संबंधित महत्त्वाचे विषय प्रभावीपणे मांडत विकासाचा व्यापक रोडमॅप सादर केला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळावा, शहराला केंद्र शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा आणि भविष्यातील विकास प्रकल्पांना गती मिळावी, या उद्देशाने त्यांनी विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन सविस्तर चर्चा केली. प्रत्येक बैठकीत शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या मागण्या ठोसपणे मांडत त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणीला गती देण्याची मागणी करण्यात आली.

**<u>दाखला नाव बदल</u>**

जन्म किंवा मृत्यू दाखल्यातील पूर्ण नाव बदलणे शक्य नसून, केवळ काना, वेलांटी, मात्रा तसेच स्पेलिंगमधील त्रुटी दुरुस्त करता येतात, असा महत्त्वपूर्ण खुलासा पुणे महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी केला आहे. नाव बदलायचे असल्यास जुने नाव कायम ठेवून 'ऊर्फ' म्हणून दुसरे नाव नोंदविता येईल, मात्र संपूर्ण नाव बदलण्याचा अधिकार महापालिकेकडे नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. नावातील बदलाची प्रक्रिया केंद्र शासनाच्या 'सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टिमद्वारे' केली जाते असल्याने या प्रक्रियेत महापालिकेला स्वतंत्र अधिकार नसल्याने पूर्ण नाव बदलणे शक्य नसल्याचं भिमाले यांनी म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर पावसाच्या मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळत होत्या. आज कमाल तापमान 27 तर किमान तापमान 22 पूर्णांक 7 अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं. उद्या देखील हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविधभारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**